


दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : १८२ ● पुणे ● सोमवार, दि. ०२ जून २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# वैष्णवी हगवणेला निलेश चव्हाणने बंदुकीचा धाक दाखवून धमकावलं होतं?

● **पोलिसांनी न्यायालयात काय सांगितलं?**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वैष्णवी हगवणे या विवाहितेने १६ मे रोजी गळफास घेऊन आयुष्य संपवलं. हुंड्यासाठी होणारा प्रचंड शारिरीक आणि मानसिक छळ सहन न झाल्याने तिने हे टोकाचं पाऊल उचललं. या प्रकरणाची पोलीस आता कसून चौकशी करत आहेत. या प्रकरणी तिचा नवरा शशांक, सासू लता आणि नणंद करीश्मा यांना आधीच अटक करण्यात आली होती. वैष्णवी हगवणेचा दीर सुशील आणि सासरे राजेंद्र हगवणे फरार झाले होते त्यांना या प्रकरणानंतर आठ दिवसांनी अटक करण्यात आली. या प्रकरणात करीश्माचा मित्र निलेश चव्हाणही सहभागी होता. त्यालाही पोलिसांनी ३० मे च्या दिवशी नेपाळहून अटक केली. आता बंदुकीचा धाक दाखवून वैष्णवीला धमकावण्यात आलं होतं का? याचा तपास पोलीस करत आहेत.

पोलिसांनी निलेश चव्हाणला शुक्रवारी या प्रकरणात अटक केली आहे. निलेश चव्हाण वैष्णवीच्या १० महिन्यांच्या बाळासह क्रूरपणे वागला असा आरोप त्याच्यावर आहे. पोलिसांनी तपास मोहीम राबवत फरार झालेल्या निलेश चव्हाणला नेपाळहून अटक केली. त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं. पोलिसांनी न्यायालयाला हे सांगितलं की निलेश चव्हाणकडे एक बंदुक आहे. या बंदुकीचा परवानाही त्याच्याकडे आहे. वैष्णवीला बंदुकीचा धाक दाखवून निलेश चव्हाणने धमकावलं होतं का? याचा तपास आता पोलीस करु इच्छितात असं पोलिसांनी न्यायालयाला सांगितलं.

एवढंच नाही तर आम्हाला निलेश चव्हाण आणि शशांक हगवणे (वैष्णवीचा पती) यांचे आर्थिक व्यवहार काय होते? तसंच सुशील हगवणे आणि राजेंद्र हगवणे यांच्याशीही तो आर्थिक व्यवहार करत होता ? हे सगळे पैलू तपासायचे आहेत. वारजे येथील पोलीस ठाण्यात २०२२ मध्ये निलेश चव्हाणच्या विरोधात कलम ३१२, ३२३, ५०६ आणि ३४ या कलमांन्वये गुन्हा दाखल असल्याची बाबही पोलिसांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. या प्रकरणानंतर तो चार महिने फरार होता आणि त्याच्या पत्नीनेच ही तक्रार त्याच्याविरोधात केली होती असंही पोलिसांनी न्यायालयाला सांगितलं. महिलांना वारंवार धमक्या देऊन त्यांचा छळ करण्यासाठी निलेश चव्हाण कुप्रसिद्ध आहे. आत्तापर्यंत त्याने आणखी किती महिलांना छळलं आहे? याचाही तपास आम्हाला करायचा आहे असं पोलिसांनी न्यायालयाला सांगितलं.

निलेश चव्हाण आणि शशांक हगवणे यांच्यात फोनवरुन काय चर्चा झाली होती? हे जाणून घेण्यासाठी पोलीस या दोघांचे फोन रेकॉर्डही तपासणार आहेत. न्यायालयाने या प्रकरणात निलेश चव्हाणला ३ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार निलेश चव्हाण हा करीश्माचा जवळचा मित्र आहे. त्याने वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिच्या १० महिन्यांच्या बाळाचा बेकायदेशीररित्या ताबा घेतला होता. एवढंच नाही तर २२ मे रोजी वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांनी निलेश चव्हाणच्या विरोधात एक FIR नोंदवली आहे. वैष्णवीला आणि आम्हाला निलेश चव्हाण धमक्या देत होता असं पोलिसांनी म्हटलं आहे.

याच बरोबर पोलीस आता निलेश चव्हाण, शशांक हगवणे, राजेंद्र हगवणे यांच्याकडे असलेल्या बंदुकांचा परवाना रद्द करण्याच्या प्रक्रियाही राबवत आहेत. पोलिसांनी शनिवारी सुशील आणि राजेंद्र हगवणे या दोघांनाही न्यायालयासमोर हजर केलं होतं. या दोघांचीही कोठडी ३ जून पर्यंत वाढवण्यात आली आहे.

## वैष्णवीची सुसाईड नोट तिच्या मृतदेहाजवळ मिळाली नाही - पोलीस

**पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तिची सुसाईड नोट तिच्या मृतदेहाजवळ मिळाली नाही. वैष्णवीच्या वडिलांनी या प्रकरणात तक्रार दाखल केली. त्यांनी असं म्हटलं आहे की वैष्णवी आणि शशांक यांच्या लग्नाच्या वेळी ५१ तोळे सोनं, चांदी, ५० लाखांची फॉर्च्युनर या सगळ्या गोष्टी त्यांनी हगवणे कुटुंबाला हुंडा म्हणून दिल्या होत्या. हुंड्याची मागणी त्यांच्याकडून सक्तीने करण्यात आली होती. लग्नाचा खर्च जवळपास १ कोटींपर्यंत करण्यात आला होता. या सगळ्या गोष्टी घडूनही हगवणे कुटुंबाने वैष्णवीचा मानसिक आणि शारिरीक छळ केला. तुझ्या वडिलांकडून दोन कोटी रुपये घेऊन ये असा तगादा तिच्या मागे लावण्यात आला होता. त्यासाठी तिचा छळ केला जात होता असा आरोप अनिल कस्पटेंनी केला आहे. माझ्या मुलीच्या मृतदेहावर अनेक जखमा होत्या, मला संशय आहे की तिची हत्या करण्यात आली असावी असंही तिचे वडील अनिल कस्पटेंनी म्हटलं आहे.**

## ठळक बातम्या

### डेक्कन क्वीनचा वाढदिवस साजरा

**पुणे (आरंभ पर्व) : पुणे आणि मुंबईला जोडणारी डेक्कन क्वीन या चाकरमान्यांच्या लाडक्या रेल्वेचा पुणे रेल्वे स्थानकावर 96 वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रेल्वे प्रवासी ग्रुपच्या अध्यक्षा हर्षा शहा यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी केक कापून वाढदिवस साजरा केला. त्यानंतर गाडी मुंबईच्या दिशेने सकाळी सव्वा सातच्या सुमारास रवाना झाली. यावेळी या रेल्वेच्या चालकांचा सत्कार करण्यात आला, त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची दखल घेण्यात आली. यावेळी मध्य रेल्वे पुणे विभागाचे जनसंपर्क अधिकारी हेमंत कुमार बेहरा, पुणे रेल्वे स्थानक संचालक संजय कुमार, पुणे रेल्वे स्टेशन व्यवस्थापक रवींद्र धुमाळ आणि अन्य प्रमुख रेल्वे अधिकारी उपस्थित होते. रेल्वे प्रवासी ग्रुपचे सदस्य ॲड. आशुतोष रानडे, सीनियर एजीपी ॲड. संजय रायरीकर, गणपत मेहता आणि सुधीर शहा यांनीही कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेऊन तो यशस्वी करण्यात मोलाचे योगदान दिले.**

### अजित पवारांविरोधात ताकदीने लढणार

**बारामती (आरंभ पर्व) : सहकार क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. कारखान्याच्या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'ब' वर्गातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे. 'ब' वर्गात अजित पवार यांची ताकद असली, तरी आमचाही उमेदवार पूर्ण ताकदीने लढेल. निवडणूक बिनविरोध होऊ देणार नाही, असे प्रतिपादन कारखान्याचे माजी अध्यक्ष रंजनकुमार तावरे यांनी केले. याबाबत पत्रकारांशी बोलताना तावरे म्हणाले, 'उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उमेदवारीचे स्वागत करतो तसेच आम्ही स्वतःला भाग्यवान समजतो की, उपमुख्यमंत्र्यांबरोबर काम करण्याची संधी मिळेल. त्यांच्याबरोबर काम करताना बरेच काही शिकायला मिळेल. त्यांच्याबरोबर काम करताना आनंद वाटेल.' अजित पवारांनी ज्या जागेतून उमेदवारी अर्ज दाखल केला, त्या 'ब' वर्गामध्ये त्यांची ताकद अधिक आहे. त्यामुळे ते तेथून निवडून येतील. मात्र, आमचाही उमेदवार निवडणूक लढवेल. ही निवडणूक बिनविरोध होऊ देणार नाही, असा विश्वास तावरे यांनी व्यक्त केला.**

## गृहोद्योगाच्या बहाण्याने १६०० महिलांची फसवणूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गृहोद्योगामार्फत रोजगार देण्याच्या बहाण्याने पुण्यातील 1 हजार 634 महिलांची 42 लाख 79 हजार 700 रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. व्यवसाय सुरू करण्यासाठी समूहाचे सभासद शुल्क म्हणून प्रत्येक महिलेकडून दोन हजार 50 रुपये घेण्यात आले आहेत. याप्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी बाबासाहेब लक्ष्मण कोळेकर आणि पत्नी जयश्री हंगरगे-कोळेकर (रा. सुयोग हॉल, भेकराईनगर, हडपसर) या दाम्पत्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार ऑगस्ट ते नोव्हेंबर 2024 या कालावधीत घडला आहे. याबाबत ज्योती उत्तम बोरावके (वय 52,रा. ससाणेनगर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोळेकर दाम्पत्याने भेकराईनगर येथे 'खुशी महिला गृहोद्योग समूह' नावाची बनावट गृहोद्योग संस्था सुरू केली. या कंपनीचा पेन्सिल पॅकिंग आणि इतर गृहोपयोगी वस्तू तयार करण्याचा व्यवसाय असल्याचे सांगण्यात आले. उद्योगवाढीसाठी फिर्यादी यांच्यासह चार व्यक्तींना वेगवेगळ्या कंपनीच्या शाखांचे प्रमुख म्हणून नेमण्यात आले. त्यानंतर व्यवसाय सुरू करायचा असेल, तर आधी महिलांना उद्योग समूहाचे सभासद व्हावे लागेल. त्यासाठी प्रत्येकी 2050 रुपये भरावे लागतील. त्यानंतर प्रत्येक महिलेला 200 रुपये प्रतिदिन असे आठवड्यातील पाच दिवस काम मिळेल, असे आमिष कोळेकर दाम्पत्याने दाखविले. त्यानंतर कोळेकर दाम्पत्याने शाखाप्रमुख म्हणून नेमणूक झालेल्यांना महिलांकडून गुंतवणूक आणण्यास भाग पाडले. त्यानुसार फिर्यादी ज्योती बोरावके यांनी तब्बल 300 महिलांकडून सात लाख 15 हजार रुपयांची गुंतवणूक गोळा केली. तसेच इतर शाखाप्रमुखांनी 1 हजार 334 महिलांकडून 35 लाख 64 हजार 700 रुपयांची गुंतवणूक कंपनीसाठी जमविली.

## पुण्यात मद्यधुंद कारचालकाने १२ जणांना उडविल्याचे प्रकरण

### पोलिसांनी मालकालाही केली अटक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील सदाशिव पेठेत असलेल्या भावे हायस्कूल जवळ एका कारचालकाने १२ जणांना उडविल्याची घटना शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या अपघात प्रकरणी कार चालकासह त्याच्या सहकाऱ्याला आणि कार मालकाला सुद्धा अटक करण्यात आली असून आज तिघांनाही पुणे न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सदाशिव पेठेत काही विद्यार्थी एका चहाच्या टपरीवर चहासाठी एकत्रित आले होते. त्याच वेळी चालक जयराम शिवाजी मुळे (वय २७, रा. बिबवेवाडी) मद्यधुंद अवस्थेत कार बेदरकारपणे चालवून १२ विद्यार्थ्यांना उडविले. जयराममुळे याच्यासोबत असलेला सहकारी राहुल गोसावी याला सुद्धा विश्रामबाग पोलिसांनी अटक केली होती. यानंतर कारचा मूळ मालक दिगंबर माधव शिंदे यालाही अटक करण्यात आली आहे. शिंदे याने त्याच्या मालकीच्या कारची चावी निष्काळजीपणे तशीच गाडीला सोडून बाहेर गेल्यामुळे त्याचा सहकारी जयराम मुळे याने त्याच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना नसताना देखील त्याचा सहकारी राहुल गोसावी याच्यासोबत दारूच्या नशेत वाहन थेट सदाशिव पेठेत नेले आणि बेदरकारपणे कार चालवत 12 जणांना उडविले. या अपघातात 11 लोकांना किरकोळ व गंभीर जखमी झाले. आता तीन जणांना अटक करण्यात आली आहे या तिघांना आज पुणे न्यायालयात हजर करण्यात येईल. या अपघातात अविनाश दादासो फाळके ,प्रथमेश पांडुरंग पतंगे, संदीप सुनील खोपडे, सोनाली सुधाकर घोळवे, मंगेश आत्माराम सुरवसे, अमित अशोक गांधी, समीर श्रीपाद भालचिकर, सोमनाथ केशव मेरूकट, प्रशांत ब्रह्मदेव बंडगर, किशोर हरिभाऊ भापकर, पायल आदेश कुमार दुर्गे, गुलणाज सिराज अहमद हे जखमी झाले आहेत.








# नीती आयोगाची बैठक अन् मोदी मंत्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली दहाव्या नीती आयोगाच्या गव्हर्निंग कॉन्सिलची बैठक शनिवारी दिल्लीत पार पडली. नीती आयोग ही संकल्पना मोदी पंतप्रधान झाल्यानंतरच्या काळात आली. तत्पूर्वी योजना आयोग होता आणि तो पंडित नेहरूंनी स्थापन केला होता. पण त्या योजना आयोगाच्या काळात राज्यांना काहीच अधिकार नव्हते आणि केवळ केंद्राच्या मम ला मम म्हणण्याशिवाय त्यांच्याकडे काहीही काम नव्हते. पण मोदी आल्यापासून राज्यांना अधिक सरकारी कारभारात आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार मिळाला आणि राज्ये तो आपला अधिकार गाजवू लागले, हे मोदी यांचे उपकार आहेत हे मान्य करायला हवे. तुलना करायची गरज नाही पण मोदी आल्यापासूनच राज्यांना आपल्या केंद्रातील वाट्यानुसार केंद्राकडून अधिक काहीतरी मिळू लागले ही वस्तुस्थिती आहे, पण ते असो. कालच्या बैठकीत मोदी यांनी आपली सर्वसमावेशक प्रशासन या प्रति कटिबद्धता व्यक्त केली आणि त्याला मोठा अर्थ आहे. कारण या आधी सर्वसमावेशकता नव्हतीच. केवळ काँग्रेसकालीन केंद्र सरकारची हडेलहप्पी होती. पण आता राज्यांना आपला वाटा मिळू लागला आहे. मोदी यांनी कालच्या बैठकीत एक उत्कृष्ट विचार मांडला आहे आणि तो म्हणजे सध्या सुरू असलेल्या क्रिकेट संघासारखा आहे. मोदी म्हणाले की टीम इंडिया हे आपले मार्गदर्शक तत्त्व असले पाहिजे. म्हणजे टीम इंडिया जसे एक संघ राहून क्रिकेट खेळते तसेच आपण त्यापासून काहीतरी शिकले पाहिजे. सर्व राज्ये आणि केंद्र सरकारे यांनी आपापसातील मतभेद मिटवून देशाच्या विकासासाठी एकत्र काम केले, तरच आपली प्रगती होईल हा तो विचार. यालाच संघराज्यवाद म्हणतात. विरोधकांना विशेषतः काँग्रेसला तो मान्य नाही. काँग्रेसने मोदी यांनी आपल्या काळात संघराज्यवाद संपवण्याचा प्रयत्न केला आहे असा अपप्रचार नेहमीच केला आहे. पण मोदी यांनी तो किती खोटा आणि बिनबुडाचा आहे हे वेळोवेळी सिद्ध केले आहे आणि त्याप्रमाणे आपले वर्तनही ठेवले आहे. राज्यांचा देशाच्या प्रगतीत मोलाचा वाटा असतो आणि प्रत्येक राज्य विकसित झाले, तरच देश विकसित होऊ शकतो असा एक जबरदस्त विचार मोदींच्या प्रतिपादनामागे आहे आणि तो शंभर टक्के खरा आहे. कारण राज्ये जर एकत्रित प्रगत झाली, तरच देश प्रगत होऊ शकतो हे सत्य आहेच. पंतप्रधान मोदी म्हणाले की प्रत्येक राज्याने किमान एक पर्यटनस्थळ विकसित करावे जे जागतिक दर्जाच्या बरोबरीचे असेल. त्यात सर्व सुविधा आणि मूलभूत संरचना असेल. यामुळे राज्य विकसित होतीलच पण देशही विकसित होऊन देशाची वाटचाल विकसित देश २०४७ कडे होईल. हाच तर पंतप्रधान मोदी यांचा मूलमंत्र आहे आणि हाच त्यांच्या भाषणाचे सार होते. पंतप्रधान मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे विकासाची चाके जलद गतीने फिरली पाहिजेत. केंद्र आणि राज्ये जर या दिशेने काम करतील तर कोणतेही उद्दिष्ट असाध्य नाही. यालाच एकात्मिक संघराज्य वाद म्हणतात आणि हाच विचार आपल्या आतापर्यंतच्या विवेचनात दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडला होता. पण त्याकडे आपण काँग्रेसच्या नादाला लागून दुर्लक्ष केले. पण मोदी यांच्या काळात आपल्याला त्याचे महत्त्व जाणवले आहे आणि त्यांचे विचार आपण पुन्हा मांडू लागलो आहोत. मोदी म्हणाले त्याप्रमाणे विकसित भारत हे प्रत्येक भारतीयाचे स्वप्न आहे आणि ती १४० कोटी भारतीय लोकांची आकांक्षा आहे. देशाला २०४७ पूर्वी विकसित भारत बनवण्यासाठी पंतप्रधानांनी प्रत्येकाने विकसित भारत बनवण्याच्या स्वप्नाचा भाग बनले पाहिजे हे वास्तवदर्शी प्रतिपादन केले. प्रत्येक राज्य विकसित, प्रत्येक नगरपालिका विकसित आणि प्रत्येक ग्रामपंचायत विकसित बनली तरच देश विकसित बनू शकतो असे प्रतिपादन मोदी यांनी केले. दीनदयाळ उपाध्याय यांचा विचार तरी यापेक्षा वेगळा काय होता. मोदी यांनी विकसित देश बनवतानाच प्रत्येक नागरिकाला आणि विकासाच्या शेवटच्या पायरीवर उभ्या असलेल्या नागरिकाला विकासात योग्य वाटा मिळेल हे पाहिले पाहिजे. कारण अमर्त्य सेन यांच्या विकासाचा दृष्टीकोन हाच तर होता. अर्थात या पंतप्रधानांच्या नीती आयोगाच्या बैठकीलाही पक्षीय राजकारणाचे विशेषतः विरोधकांच्या विचारांचे आणि राजकारणाचे ग्रहण लागलेच. कारण काँग्रेसने या बैठकीला विरोध केला आणि राहुल गांधी यांचे ते कामच आहे. त्यांच्याकडून याबाबत वेगळी अपेक्षा ठेवता येणारच नाही. पण सर्व मुख्यमंत्रीही या बैठकीला हजर राहिले नाहीत. त्यांची कारणे त्यांच्याकडे असोत, पण पंतप्रधानाच्या उपस्थितीत बोलवलेल्या बैठकीला अनुपस्थित राहण्याचे धैर्य या मुख्यमंत्र्यांनी दाखवले त्याबद्दल खरे तर संघराज्याचेच कौतुक करायला हवे. कारण इतके स्वातंत्र्य मुख्यमंत्र्यांना असते. सर्वात शेवटी म्हणजे मोदी यांनी एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडला तो महिलांच्या सहभागाचा. महिलांना आदरपूर्वक आम्ही आपल्या वर्कफोर्समध्ये सहभागी करून घेतले पाहिजे हा त्यांचा मुद्दा अत्यंत कळीचा आहे. कारण महिलांना जर सामावून घेतले नाही, तर विकासात काही अर्थ उरणार नाही. विकास म्हणजे सर्वांना बरोबर घेऊन केलेला विकास. हा मोदी यांचाच मूलमंत्र आहे. त्यानुसारच मोदी यांनी वरील घोषणा केली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या या भाषणातून एक साध्य झाले आहे. ते म्हणजे विकसित भारत होण्यासाठी भारत सज्ज झाला आहे आणि आता तो त्यानुसार वाटचाल करणार आहे. विरोधी पक्ष कितीही राजकारण करोत अथवा सहकार्य करोत. पण मोदी यांचा वज्रनिर्धार कायम राहील आणि विकासाच्या मार्गावर भारत तशीच अविरत वाटचाल करत राहील अशी ग्वाही या निमित्ताने सर्वांना मिळाली आहे. विरोधकांना त्याचे राजकारण लखलाभ असो. कारण काँग्रेसचे जयराम रमेश यांनी मोदी यांच्याबद्दल म्हटले की ही अयोग्य बैठक आहे. पण रमेश यांच्या काँग्रेसच्या काळात नियोजन आयोगाच्या बैठका कशा चालतात हे सार हे साऱ्यांना माहीत आहे. त्यामुळे रमेश काहीही म्हणोत, मोदी आणि भारत यांचा अश्व आता धावत राहणार आहे.

# पोटातील - १३ किलो गाठ काढून महिलेस जीवदान

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

काळेवाडी रहाटणी परिसरातील परिसरातील स्पर्श हॉस्पिटल मध्ये एका महिलेच्या पोटातून तब्बल 13 किलो 150 ग्रॅम ची गाठ काढून महिला रुग्णास जीवदान लाभले.

याबद्दल सविस्तर माहिती अशी की एक ३५ वर्षीय महिला सोलापूर -माळशिरस या भागातून स्पर्श हॉस्पिटल मध्ये नाव ऐकून दाखल झाली. तिला साधारणतः एक वर्षापासून पोटाचा त्रास चालू झाला. कालांतराने त्रास वाढला.



गेल्या दोन महिन्यात पोटाचा घेर वाढणे, दम लागणे, चालताना धाप लागणे भूक न लागणे,पोटात गॅस होणे, पायांना सूज येणे इत्यादी लक्षणे वाढली. परिस्थिती व अज्ञानामुळे तिने आजार अंगावर काढला. महिला स्पर्श हॉस्पिटल मध्ये दाखल झाल्यानंतर सर्व तपासणी नंतर दिनांक 21 मे रोजी चार तासाची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया पार पडली.

शस्त्रक्रिया करताना मुख्य शल्यचिकित्सक- सर्जन डॉ. अशोक लांडगे व भूलतज्ञ डॉ. दिलीप मेहता असून डॉ. आदित्य बसवनाथे, डॉ सोपान क्षिरसागर, डॉ. सोमनाथ निकम, डॉ आशिष तायडे, डॉ. ऋषी भाकरे आदी सहकारी होते.

शस्त्रक्रिया यशस्वीपणे घडवून आणण्यासाठी डॉ प्रदीप तावरे, डॉ. स्नेहल लांडगे तसेच रोशन सावंत -ऑपरेशन थिएटर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

या बद्दल माहिती देताना डॉ. अशोक लांडगे यांनी सांगितले एका बाळाचे वजन साधारणतः अडीच ते तीन किलो असते. त्यानुसार सदर महिला ही चार ते पाच बाळा एवढे वजन घेऊन जगत होती.

गाठ काढण्यापूर्वीचे महिलेचे वजन 78 किलो असून नंतर ६४.३५ एवढे झाले गाठीचे वजन गाठीचे वजन 13.150 किलोग्रॅम असून आकारमान 50 x 45 x 49 सेंटीमीटर असा आहे.

महिलेस मुलबाळ नसल्याने तिचे गर्भाशय व डावे स्त्रीबीज वाचविण्यात यश आले. आतापर्यंत हॉस्पिटलमध्ये डॉ. लांडगे यांनी 5 ते 6 किलो पर्यंतच्या गाठीचे शस्त्रक्रिया यशस्वीपणे केले असून प्रथमत: 13 किलो पर्यंत वजनाच्या गाठीची दुर्मिळ शस्त्रक्रिया करण्यात आली.

### रुग्ण -नातेवाईक यांचे मनोगत....

**पुणे येथील आमच्या नातेवाईकाकडून स्पर्श हॉस्पिटल तसेच डॉ. अशोक लांडगे यांच्या बद्दल ऐकून आम्ही येथे दाखल झालो. सर्व तपासण्यां अंती डॉक्टरांच्या टीमने चार तास शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेनंतर आमच्या रुग्णाचे सर्व लक्षणे.. पोटाचा घेर.पायाची सूज. दम लागणे इत्यादी कमी झाली व रुग्ण शस्त्रक्रियेतून सुखरूप बाहेर आला व बरा झाला. एक प्रकारचे आमच्या रुग्णास नवजीवन मिळाले असे आम्हास वाटते. त्याबद्दल स्पर्श हॉस्पिटल व सर्व स्टाफ यांचे मनापासून आभार.**

**- राजेंद्र साळवे, कुणाल निकाळजे, (रुग्ण नातेवाईक)**

## PCMC : एकूण ८८ जण सेवानिवृत्त



**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

महापालिका सेवेतून निवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, निरोगी आणि आनंदी जीवन जगावे तसेच आपल्या कुटुंबीयांना वेळ द्यावा. याशिवाय नोकरीदरम्यान राहून गेलेले पर्यटनासारखे आवडते छंद जोपासावेत असे मत अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी व्यक्त केले आणि सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पुढील आनंदी व आरोग्यदायी जीवनासाठी शुभेच्छाही दिल्या. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे माहे मे २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या ८२ तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या ६ अशा एकूण ८८ कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे आणि तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते येथे सत्कार करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे बोलत होते. या कार्यक्रमास शहर अभियंता मकरंद निकम, उप आयुक्त मनोज लोणकर, संदीप खोत, राजेश आगळे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, लेखाधिकारी चारूशिला जोशी, कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे तसेच अभिमान भोसले, मनोज माचरे आणि महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नातेवाईक उपस्थित होते.

# राजेश्वर मंदिर स्वच्छता अभियान व अभिषेक

**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टी खेड तालुका व राजगुरुनगर मंडल यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त वाफगाव (ता.खेड) येथील ऐतिहासिक राजेश्वर मंदिर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. हे मंदिर अहिल्यादेवी होळकर यांनी बांधले असून प्राचिन स्थापत्यकौशल्याचे प्रतिक मानले जाते.

या अभियानात मंदीर व परिसरातील कचरा, रानटी झुडपे, अनावश्यक वाढलेले गवत, वेली काढण्यात आल्या. आजूबाजूला पडलेला प्लॅस्टीकचा कचरा गोळा करून त्याचे ओला व सुका कचरा असे वर्गीकरण केले. त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था केली.



स्वच्छता अभियानानंतर मंदिरात सामूहिक अभिषेक करण्यात आला. उपस्थित कार्यकर्त्यांनी आणि ग्रामस्थांनी श्रद्धेने सहभागी होत मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्याचा यावेळी संकल्प केला.

यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या महान कार्याचा स्मरण सोहळा पार पडला. त्यांच्या लोकहितवादी कार्याची आठवण करून देत, उपस्थितांनी "पुण्यश्लोक हिंदू रणरागिणी अहिल्यादेवी होळकर यांचा विजय असो", "हर हर महादेव", "भारत माता की जय" अशा घोषणा दिल्या.

या उपक्रमाचे संयोजन राजगुरूनगरचे माजी नगराध्यक्ष तथा राजगुरूनगर मंडल अध्यक्ष शिवाजी मांदळे, राजगुरूनगर व्यापार आघाडी अध्यक्ष नितिन शहा, प्रविण वाईकर, अक्षय पऱ्हाड, दत्ता सांडभोर, साहेबराव शेलार, धनंजय देव्हरकर, निलेश घुमटकर, धनंजय भागवत, किशोर कुमठेकर यांनी केले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या लोककल्याणकारी राज्याचा आदर्श घेऊन

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची वाटचाल

## आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह : पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या पुतळ्यास महापालिकेच्यावतीने अभिवादन

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या युध्दनितीनिपुण,उत्कृष्ट प्रशासिका,मुत्सद्दी आणि जनहिताच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या आदर्श राज्यकर्त्या होत्या, त्यांनी आपल्या कारकीर्दीत जनकल्याण, न्यायव्यवस्था आणि विकासात्मक योजना प्रभावीपणे राबवल्या. त्यांच्या याच लोककल्याणकारी धोरणांचा आदर्श घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची वाटचाल सुरु असल्याचे मत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त मोरवाडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे,आमदार अमित गोरखे, उमा खापरे, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगर सदस्य शत्रुघ्न काटे, राजू दुर्गे, मारुती भापकर, माजी नगरसदस्या अनुराधा गोरखे, उप आयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता नितीन देशमुख, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्त्या विना सोनवलकर, सोनाबाई गडदे, सामाजिक कार्यकर्ते युवराज दाखले, पोपट हजारे, विठ्ठल देवमाने, विजय भोजने, दीपक भोजने, गणेश भांडवलकर, ज्ञानेश्वर गोजावले, आदी उपस्थित होते.

तसेच पिंपरी येथील महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिकेच्या वतीने अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उप आयुक्त सचिन पवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते युवराज दाखले, मच्छिंद्र चिंचोले, शिवाजीराव खडसे, मनोज मोरे, संजय कांबळे, रघुनाथ मलिशे, यशराज चिंचोले तसेच विविध विभागातील कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

तर सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी नगर सदस्य प्रशांत शितोळे, सागर अंघोळकर, विशेष अधिकारी किरण गायकवाड तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित तीन दिवसीय विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दुसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध व्याख्याते नितीन बानगुडे पाटील यांनी आपल्या खास शैलीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन चरित्रावर व्याख्यान सादर केले. यामध्ये अहिल्यादेवी यांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग अत्यंत समर्पक शब्दात उपस्थित नागरिकांना समजावून सांगितला.


# थोडक्यात



## विशाल नगरमधील कचरा उचलणाऱ्या गाड्यांची दयनीय अवस्था : काळे

**पिंपळे निलख (आरंभ पर्व) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पिंपळे निलख - विशाल नगर परिसरात कचरा संकलनाचे काम AG Enviro या खासगी ठेकेदारामार्फत करण्यात येते. मात्र, या ठेकेदाराकडून कामात गंभीर हलगर्जीपणा होत असून, त्यामुळे नागरिकांच्या तसेच वाहनचालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. कचरा संकलनासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची अवस्था अतिशय खराब असून, काही गाड्यांच्या पायऱ्यांजवळ मोठे भगदाड पडले आहे. अशा भगदाडात चालकाचा पाय अडकला, तर गंभीर अपघात होण्याची शक्यता आहे. ही बाब पूर्णपणे दुर्लक्षित ठेवली जात आहे. याशिवाय, ओला व सुका कचरा वेगवेगळा संकलित करणे गरजेचे असतानाही, दोन्ही प्रकारचा कचरा एकत्रितपणे उचलला जात आहे. त्यामुळे पर्यावरण नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. दररोज एक तरी गाडी खराब पडत असल्यामुळे परिसरातील कचरा नियमितपणे उचलला जात नाही. परिणामी, नागरिकांना दुर्गंधी व अस्वच्छतेला सामोरे जावे लागत आहे. महापालिकेने आणि संबंधित अधिकाऱ्यांनी या समस्येकडे तातडीने लक्ष देणे अत्यावश्यक आहे.**

## पिं.चिं आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव म्हणजे पालिकेचा स्तुत्य उपक्रम



**पिंपळे निलख (आरंभ पर्व) : पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित पहिल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे रसिकांनी स्वागत आहे. दिनांक 29 मे ते 31 मे दरम्यान सुरू असलेल्या या महोत्सवात 39 देशातील चित्रपट सहभागी झाले होते. पुणे शहरांत होणाऱ्या पुणे इंटरनॅशनल ( PIFF ) ची आठवण आज या ठिकाणी झाल्याचे पिंपरी चिंचवड कल्चरल फाउंडेशन ( PCCF ) चे अध्यक्ष विजय भिसे यांनी सांगितले . पिंपरी चिंचवड शहर देखील यात मागे नाही हे दाखवत आयुक्त शेखर सिंह यांच्या पुढाकाराने हा महोत्सव पार पडला. पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या संख्येने देशाच्या विविध भागातून आलेला चित्रपट प्रेमी वर्ग आहे. जगभरातील सिनेमा पाहण्याची संधी त्यांना या निमित्ताने उपलब्ध केली अशी भावना PCCF चे अध्यक्ष विजय भिसे यांनी या ठिकाणी व्यक्त केली. ग .दि .मा. नाट्यगृह या महोत्सवासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. नाट्यगृहाचा अशा उपक्रमां साठी वापर केल्यास त्याचा फायदाच होईल. सातत्याने नाटकांच्या प्रयोगासाठी नाट्यगृहाच्या रचनेवरून टीका होत असते . अशा प्रकारे विविध कला ,साहित्य, संगीत आणि सांस्कृतिक कार्यक्रमासाठी नाट्यगृह उपलब्ध झाल्यास ते वर्षभर उपयोगात येईल, असेही विजय भिसे म्हणाले.**

## डॉ. डी. वाय पाटील आयुर्वेद महाविदयालयात योगोत्सवाचे आयोजन

**पिंपळे निलख (आरंभ पर्व) : केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने देशभर होणाऱ्या योग दिनाच्या प्राचारार्थ पिंपरी येथील डॉ डीवाय पाटील आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या वतीने भव्य योगा दिन जागृती साठी योगोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ प्रशांत खाडे यांनी दिली. हा योगोत्सव दि. - ३ जून २०२५ मंगळवार स ७:०० ते ७:४५ या वेळेत डॉ. डी. वाय पाटील आयुर्वेद महविदयालय आणि संशोधन केंद्र पिपरी येथे होणार आहे. जागतिक योग दिन हा २१ जून ला साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने "शंभर दिवस शंभर शहरात,शंभर आयोजन" हा योगदिना पूर्वी जनजागृती कार्यक्रम राबवत आहे. आयुष मंत्रालय मोराराजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेच्या माध्यमातून हा उपक्रम देशभरात राबवत आहे. त्याचाच हा एक भाग आहे. यावेळी शहरातील ६०० जण सहभागी होणार आहे. "एक पृथ्वी, एक आरोग्य साठी योग" या जागतिक संकल्पनेवर अंतराराष्ट्रीय योग निमित्त आयोजित या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे. यावेळी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार आप्पा बारणे, आयुक्त शेखर सिंग, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.**

## थोडक्यात




### बाह्यस्त्रोत वीज कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी महावितरण सकारात्मक

पुणे (आरंभ पर्व) : महावितरणच्या ग्राहकसेवेचे कर्तव्य बजावण्यासाठी बाह्यस्त्रोत वीज कर्मचारी महत्त्वाचे योगदान देत आहेत. त्यांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी महावितरणचे प्रशासन सकारात्मक आहे, अशी ग्वाही महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी शनिवारी (दि. ३१) दिली. शनिवार पेठ येथील स्व. बाळासाहेब साठ्ये सभागृहात महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या राज्यभरातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शक म्हणून संचालक श्री. पवार बोलत होते. यावेळी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भूपेंद्र वाघमारे, प्रदेश अध्यक्ष श्री. नीलेश खरात, महामंत्री श्री. सचिन मेंगाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मानव संसाधन संचालकपदी निवड झाल्याबद्दल श्री. पवार यांचा संघटनेकडून सत्कार करण्यात आला. संचालक श्री. राजेंद्र पवार सांगितले की, महावितरणमधील विद्युत सहायक पदाच्या सरळ भरतीसाठी नुकतीच परीक्षा झाली आहे. या सरळ भरतीमध्ये बाह्यस्त्रोत कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांना वयोमर्यादेत सवलत देण्यात आली आहे. तसेच अनुभव प्राप्तीचे १० गुण देण्यात येत आहे. त्याचा कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांना निश्चितच फायदा होईल. कार्यक्रमाला उपमहामंत्री श्री. राहुल बोडके, संघटनमंत्री श्री. उमेश आनेराव, पुणे झोन सचिव श्री. निखिल टेकवडे यांच्यासह २२ जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

### समितीमुळे ग्रामीण विद्यार्थिनींचे शिक्षण सुकर

पुणे (आरंभ पर्व) : विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहात मुलींसाठी निवासाची व्यवस्था वाढवल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना पुण्यात उच्च शिक्षण घेणे सोपे होणार आहे. यंदाच्या वर्षासाठी समितीचे प्रवेश सुरू झाले आहेत. ग्रामीण भागातील गरजू, होतकरू आणि अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थी-विद्यार्थिनी ज्यांनी उच्च शिक्षणासाठी पुण्यात प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थिनींनी या टप्प्यात अर्ज करावेत, असे समिती व्यवस्थापनाने कळविले आहे. पुण्यात समितीच्या दोन नवीनवसतिगृहांची उभारणी झाल्याने ३३६ मुलींची व्यवस्था वाढली आहे. अल्पदरात निवास आणिभोजनाच्या सुविधेबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी समितीत विविधउपक्रम राबविले जातात. केवळ समाजाच्या मदतीवर गेली ७० वर्षे हे काम सुरू आहे. समितीचीपुण्यात मध्यवर्ती ठिकाणी सध्या सात वसतिगृहे असून १२०० हून अधिक मुला-मुलींची व्यवस्थाआहे. यातील चार वसतिगृहे मुलींसाठी असून तेथे ७०० हून अधिक विद्यार्थिनींची सोयआहे. शेतकरी, शेतमजूर कुटुंबांतूनही मुलींनी उच्च शिक्षण घ्यावे, यासाठी अलीकडेप्रोत्साहन मिळत आहे. सुरक्षितता आणि परवडणाऱ्या दरात निवास, भोजनाची व्यवस्थाअसल्याने समितीत प्रवेशाकडे विद्यार्थिनींचा ओढा असतो. समितीची प्रवेश प्रक्रियायेत्या ६ जूनपासून सुरू होणार असून पुणे व अहिल्यानगर येथे उच्च शिक्षणासाठीप्रवेश घेतलेल्या ग्रामीण भागातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत, असे समिती व्यवस्थापनाने कळविले आहे. प्रवेश अर्ज समितीच्या वेबसाइटवर (www.samiti.org) ऑनलाइन उपलब्ध असणार आहेत.

### पीएमपीतील प्रवासी महिलांकडील दागिने चोरणारा गजाआड

पुणे (आरंभ पर्व) : पीएमपीतील प्रवासी महिलांकडील दागिने चोरणाऱ्या चोरट्याला येरवडा पोलिसांनी अटक केली. चोरट्याकडून एक लाख २५ हजारांची सोनसाखळी जप्त करण्यात आली.सुशांत शंकर गायकवाड (वय २४, रा. साईनाथनगर, खराडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. गेल्या काही दिवसांपासून पीएमपी प्रवासी महिलांकडील दागिने चोरून नेण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पीएमपी बसमध्ये चोरी करणाऱ्या चोरट्यांना पकडण्याच्या सूचना पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे यांनी दिल्या होत्या. पीएमपी प्रवासी महिलेच्या गळ्यातील चोरलेली सोनसाखळी विक्री करण्यासाठी गायकवाड येरवडा बाजारातील सराफी पेढीत येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी विजय अडकमोल आणि नटराज सुतार यांना खबऱ्याने दिली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून गायकवाडला पकडले. त्याच्याकडून सोनसाखळी जप्त करण्यात आली.

# 'श्री शिवगोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक महामंडळ' असे नाव द्यावे


## मच्छिंद्र चव्हाण यांची मागणी; 'परमपूज्य गंगानाथ महाराज आर्थिक विकास महामंडळ' नावाला नाथपंथी समाजाचा आक्षेप




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"विधानसभा निवडणुकीआधी महायुती सरकारने भटक्या विमुक्त जाती-जमातीतील नाथपंथी समाजासाठी 'वसंतराव नाईक भटक्या विमुक्त जाती आर्थिक विकास महामंडळ' अंतर्गत उपकंपनी म्हणून स्थापन करण्यात आलेल्या महामंडळाला दिलेले 'परमपूज्य गंगनाथ महाराज आर्थिक विकास महामंडळ' हे नाव त्वरित बदलून त्याचे नाव 'श्री शिवगोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक महामंडळ' असे करावे," अशी मागणी नाथपंथी समाजाचे प्रतिनिधी व निवृत्त पोलीस उप-अधीक्षक मच्छिंद्र चव्हाण यांनी केली. अखिल नाथपंथी डवरी गोसावी, नाथजोगी, नाथबाबा, गोंधळी, बहरूपी, भारूडी या भिक्षुक, भटक्या जाती-जमातीच्या राज्यभरातील समाजबांधवांनी शनिवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे राज्यस्तरीय बैठक घेऊन महामंडळाचे नामांतर करण्याचा ठराव मंजूर केला. मच्छिंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात झालेल्या या बैठकीला निवृत्त महसूल उपायुक्त आनंदराव जगताप, महादेव शिंदे, डॉ. जयाजी नाथसाहेब, नारायण शिंदे, भालचंद्र सावंत, अंबरनाथ इंगोले, डॉ. सुभाष भोसले, सुमित लगस, मोहन शिंदे, बाबा शिंदे, संजय सावंत, संजय जगताप, अशोक शिंदे, अविनाश शिंदे, दयानंद सावंत, गणेश लगस, अनिल चव्हाण, सहदेव सावंत, ॲड. नवनाथ शिंदे यांच्यासह मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण विभाग या राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारोंच्या संख्येने नाथपंथी समाजबांधव उपस्थित होते.

मच्छिंद्र चव्हाण म्हणाले, "विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ घोषित केले. याचे स्वागत करीत संपूर्ण महाराष्ट्रातील नाथपंथी समाज बांधवानी महायुतीला भरभरून मतदान केले. सरकार स्थापन झाल्यावर मंत्रिमंडळाने हे महामंडळ स्थापनही केले. मात्र, काही लोकांनी खोटी माहिती देऊन या महामंडळाला 'परमपूज्य गंगनाथ महाराज आर्थिक विकास महामंडळ' असे नाव दिले. गंगानाथ महाराज हे एका निवृत्त पोलीस अधिकाऱ्याचे वडील असून, त्यांचे समाजासाठी कोणतेही योगदान नाही. शिवाय, सदरचे निवृत्त पोलीस अधिकारी हे महामंडळ स्वतःची मालमत्ता असल्याचे भासवून समाजामध्ये दादागिरी करू लागले आहेत. परिणामी, नाथपंथी समाजामध्ये रोष निर्माण झाला आहे. या महामंडळ सर्वसमावेशक नाव देण्याची मागणी, चर्चा व वादविवाद समाजामध्ये गेल्या चार महिन्यांपासून सुरु आहेत. याच पार्श्वभूमीवर ही बैठक महत्वपूर्ण ठरली." भालचंद्र सावंत म्हणाले, "महामंडळाचे नाव तात्काळ बदलून 'श्री शिवगोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ' असे करावे. या महामंडळाला स्वायत्त दर्जा द्यावा. तसेच ५०० कोटींची आर्थिक तरतूद करावी, झोपडीत, पालांमध्ये राहणाऱ्या गोरगरीब नाथपंथी समाजबांधवांना महामंडळाकडून आर्थिक लाभ घेता यावा, यासाठी जाचक अटी शिथिल कराव्यात. समाजावर होणारे अन्याय, अत्याचार व विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी यशवंतराव चव्हाण पालमुक्त योजना शासनाने प्रत्यक्ष राबवावी, आदी ठराव बैठकीत संमत करण्यात आले आहेत. यापुढील कायदेशीर आणि रीतसर प्रक्रिया करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली असून, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व संबंधित खात्याचे मंत्री यांच्यासोबत पाठपुरावा करेल."



## विमानतळावरून उड्डाणांत वाढ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आता दररोज २३५ विमानांची ये-जा होणार आहे. यापूर्वी दिवसातून २२० विमानांची ये-जा होत होती. पुणे विमानतळावरून विमान प्रवासाच्या वारंवारितेत वाढ करण्यात यावी, अशी गेल्या अनेक दिवसांपासून मागणी केली जात होती. याबाबत केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग यांना पत्र पाठवले होते. त्याला प्रतिसाद देऊन हवाई दलाकडून आणखी १५ उड्डाणांसाठी मंजुरी देण्यात आली. त्यानुसार पहाटे सहा ते रात्री साडेदहा या वेळेत २३५ विमाने ये-जा करतील.

## परंपरेची ओळख हरवतेय – प्रा. प्र. के. घाणेकर यांची खंत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'पुण्यात अश्मयुग, राष्ट्रकूट, सातवाहन काळातील शिल्पांपासून छत्रपती शिवाजी महाराज, पेशवे यांच्या काळातील संस्कृतीचा ठेवा आहे. मात्र, त्याकडे आपले लक्ष नसून आपण त्यांची ओळख हरवत चाललो आहोत,' अशी खंत इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. प्र. के. घाणेकर यांनी व्यक्त केली. प्रसाद प्रकाशनातर्फे ११ पुस्तकांचे आणि अनाहत प्रकाशनातर्फे सात, अशा एकूण १८ विविध पुस्तकांचे प्रकाशन शनिवारी झाले. त्या वेळी प्रा. घाणेकर बोलत होते. गीता धर्म मंडळाचे अध्यक्ष डॉ. मुकुंद दातार यांच्या हस्ते कै. मनोहर बापूसाहेब जोशी स्मृती गौरव पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांना, तर ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता यांना कै. मंजिरी मनोहर जोशी स्मृती गौरव पुरस्कार या वेळी प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे विश्वस्त राजेश पांडे आणि प्रसाद प्रकाशनाच्या संपादक डॉ. उमा बोडस हे या वेळी उपस्थित होते. प्रा. घाणेकर म्हणाले, 'पुण्यात ६५ पेक्षा जास्त संग्रहालये, ५० पेक्षा अधिक शतायुषी संस्था, ज्या देव-देवतांची संपूर्ण भारतात, महाराष्ट्रात मंदिरे नाहीत अशी मंदिरे आहेत. शहरात २२५ हून अधिक उद्याने आहेत.



लष्करी आस्थापनांसह निसर्गरम्य ठिकाणेही पुण्यात सर्वाधिक आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासकही पुण्यातच आहेत.' 'जगातील प्रत्येक देशात वेगवेगळी संस्कृती असून त्यांचे फक्त अवशेष उरले आहेत.

मात्र, भारत असा एकमेव देश आहे, ज्या देशात हजारो वर्षांच्या परंपरेचे दाखले, साहित्य असे संस्कृतीचे मोठे आभाळ अस्तित्वात आहे. ही संस्कृती अद्याप टिकून आहे. माणसे आणि माणसांचे कल्याण ही कल्पना साहित्यातून उलगडून पाहिली जात असून, अशी भारतीय संस्कृती, वारसा टिकवून पुढे घेऊन जाणे ही काळाची गरज आहे,' असे मत डॉ. अरुणा ढेरे यांनी व्यक्त केले.

## निविदा सुचना

### ग्रामपंचायत देवोशी, ता. खेड, जि. पुणे.

**बी-१, निविदा सुचना**

ग्रामपंचायत देवोशी यांचे मार्फत खालील कामांची सिलबंद निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत देवोशी यांजकडून दि. ०२/०६/२०२५ ते ०९/०६/२०२५ या कालावधीत शासकीय कामकाजाच्या दिवशी सकाळी १०: ०० ते ४:०० या वेळेत देण्यात येतील व ठेकेदार यांचेकडून पाठविण्यात आलेल्या सीलबंद निविदा सदर कालावधीत स्वीकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि. १०/०६/२०२५ रोजी सायंकाळी ४ : ०० वाजता किंवा ग्रा.पं.देवोशीच्या नजीकच्या मासिक सभेत उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | कालावधी | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे देवोशी येथील पवारवस्ती येथे रस्ता काँक्रीटीकरण करणे. ता. खेड | ५,००,०००/- | १००/- | ६ महिने | २०% जि.प. निधी (समाजकल्याण) सन २०२४-२५ |
| २ | देवोशी येथील लव्हाळेवस्ती येथे रस्ता काँक्रीटीकरण करणे. | ५,००,०००/- | १००/- | ६ महिने | २०% जि.प. निधी (समाजकल्याण) सन २०२४-२५ |

टीप : १)कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील. २) नोंदणीकृत शासकीय प्रमाणपत्र, जी.एस.टी., पॅनकार्ड, इसारा रक्कम, डीमांड ड्राप्ट, निविदा फी ठेकेदाराने सिलबंद पाकीटात द्यावेत. ३) तीन वर्षांचे इन्कमटॅक्स रिटर्न, वार्षिक विवरणपत्र, कामाचा अनुभवाचा दाखला जोडावा.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत देवोशी, ता. खेड, जि. पुणे.

सही/-
सरपंच,
ग्रामपंचायत देवोशी, ता. खेड, जि. पुणे.

## निविदा नोटीस

ग्रामपंचायत महाळुंगे इंगळे, ता.खेड, जि.पुणे हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या सीलबंद निविदा ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहे. निविदा नमुना ग्रा.पं. महाळुंगे इंगळे, ता. खेड, जि. पुणे यांजकडून दि. ०२/०६/२०२५ ते ०९/०६/२०२५ पर्यंत दुपारी ०२ :०० वाजेपर्यंत देण्यात येतील. व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा याच कालावधीत १० : ०० ते ०५:०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. व शक्य झाल्यास मुदतीच्या शेवटच्या दिवशी सायं. ०५: १० वाजता उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निधीस्तर | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | गट नंबर ३७३ काँक्रिट रोड करणे. | १५वा वित्त आयोग | ९,९८,९५५/- | ९,९८९/- | ५००/- |
| २ | नविन गावठाण बाळकृष्ण काळे मिळकत ते कचरा डेपो रस्ता काँक्रिट करणे. | ग्रामनिधी | ९,९८,९५५/- | ९,९८९/- | ५००/- |
| ३ | श्रीपती बाबा महाराज विद्यालय व कचरा डेपो कंपाऊंड करणे. | ग्रामनिधी | ९,९८,४२०/- | ९,९८४/- | ५००/- |
| ४ | न.पा.पु. टाकी कंपाऊंड वॉलला गेट बसविणे व जाळी लावणे व जनरेटरसाठी पत्रा शेड बांधकाम करणे. | १५वा वित्त आयोग व ग्रामनिधी | | | |

टीप : १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे. २) कोणतीही निविदा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे. ३) सदर निविदा बंद लिफाफ्यामध्ये आवश्यक आहे. ४) सोबत पुढील कागदपत्रे आवश्यक आहे. (अ. नोंदणी प्रमाणपत्र, ब. जीएसटी रजीस्ट्रेशन, क. पॅनकार्ड).

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत महाळुंगे इंगळे, ता.खेड, जि.पुणे

सही/-
सरपंच,
ग्रामपंचायत महाळुंगे इंगळे, ता.खेड, जि.पुणे

# ख्रिश्चन समाजावरील अत्याचार थांबवा, व राजकीय प्रतिनिधित्व, स्वतंत्र महामंडळ द्या - पी विल्सन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशात ख्रिस्ती समाजावर दिवसागणिक अत्याचार वाढत आहेत, संविधानिक हक्काचा भंग काही जातीवादी शक्ती करीत आहे, मणिपूरचा प्रसंग, फा. स्टेन वरील अन्याय, चर्च वर होणारे हल्ले, ख्रिस्ती शाळा,पास्टर यांवर होणारे हल्ले निषेधार्ह आहेत. असे सांगत अल्पसंख्याक आयोगाला खऱ्या अर्थाने जागे करावे लागेल, महाराष्ट्र राज्यातील ख्रिस्ती बांधवाना राजकीय प्रतिनिधित्व मिळण्यासाठी प्रयत्न करणार, व लवकरच राष्ट्रीय पातळीवर समिती बनवणार असल्याचे द्रमुकचे राज्यसभा खासदार पी विल्सन यांनी सांगितले. तसेच दलित ख्रिश्चनांना सवलती संविधानाच्या आधारे मिळाल्या पाहिजे अशीही मागणी त्यांनी केली.




रिजनल ख्रिस्ती सोसायटीच्या वतीने प्रशांत (लुकास) केदारी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित सहाव्या ख्रिस्ती हक्क परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी खासदार पी. वील्सन बोलत होते. हक्क परिषदेच्या अध्यक्षस्थानी दिलीप नाईक होते. याप्रसंगी पुणे प्रांताचे धर्मगुरू फा. रॉक अल्फानसो, पा. पिटर जॉर्ज, सतिश मेहेंद्रे, आमदार बापूसाहेब पठारे,सिस्टर दिव्या,फा. विजय नायक, माजी उपमहापौर सिद्धार्थ धेंडे,जॉन फर्नांडिस,फा. जो गायकवाड,रिपब्लिकन युवा मोर्चाचे राहुल डंबाळे, मुस्लिम कॉन्फरन्स चे अध्यक्ष. झुबेर मेमन, आप पक्षाचे सुदर्शन जगदाळे,सामाजिक कार्यकर्ते हुलगेश चलवादी,फेबियणं सॅमसन,खिसाल जाफरी,राजेश केळकर, समुईल सांडीराज, प्रियंदर्शनी,उद्योजक नितीन काळे, शिरीष हिवाळे, ख्रिस्ती लीगल असोसिएशन चे ॲड.बाजीराव दळवी यांनी मूलभूत हक्का विषयी माहिती दिली,पा.पद्माकर, विल्सन भोसले, पा. सुधीर साबळे, स्टीवेन गोडे,सत्यवान गायकवाड, फा.रोलँड व समाजातील सर्व सामाजिक कार्यकर्ते, संघटना प्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविकपर भाषणात प्रशांत(लुकास) केदारी यांनी समाजावर होणाऱ्या अत्याचाराची दाहकता मांडली,राज्यस्तरीय सुरक्षा समिती,राजकीय प्रतिनिधित्व द्यावे, ख्रिस्ती समाजाला महामंडळ दयावे अशी अग्रही मागणी केली,समाजावर खोटे गुन्हे दाखल केले जातात व समाजाची बदनामी करणे समाज कंटकांनी थांबवावे असे प्रतिपादन केले, खासदार पी.विल्सन यांनी संपूर्ण भारतात कशा प्रकारे खोटे धर्मांतरनाचे गुन्हे टाकले जातात, अत्याचार हा दिवसागणिक वाढत आहे, संविधानिक हक्काचा भंग काही जातीवादी शक्ती करीत आहे, त्याच वेळी मणिपूर चा प्रसंग, फा. स्टेन वरील अन्याय, चर्च वर होणारे हल्ले, ख्रिस्ती शाळा,पास्टर यांवर होणारे हल्ले याचा निषेध केला, तसेच अल्पसंख्याक आयोगाला खऱ्या अर्थाने जागे करावे लागेल असे परखडपणे सांगितले, महाराष्ट्र राज्यतिल ख्रिस्ती बांधवाना राजकीय प्रतिनिधित्व मिळण्यासाठी प्रयत्न करणार, व लवकरच राष्ट्रीय पातळीवर समिती बनविणार असे सांगितले.



## थोडक्यात



### अखंड भारतात देवभूमी निर्माण करणाऱ्या अहिल्याबाई होळकर

मुंबई (आरंभ पर्व) : बद्रीनाथपासून रामेश्वरापर्यंत आणि द्वारकापासून जगन्नाथ पुरीपर्यंत अखंड भारतात देवभूमी निर्माण करणाऱ्या, भारतवर्षाचा भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक असा चौफेर विकास घडवणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या खऱ्या अर्थाने हिंदू धर्माच्या रक्षक होत्या, असे प्रतिपादन काँग्रेस पक्षाच्या अनुसूचित जाती विभागाचे शहराध्यक्ष श्री. सुजित यादव यांनी केले. या निमित्ताने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त, सारसबाग समोरील त्यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभाग व ओबीसी विभागाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अरविंदभाऊ शिंदे, ओबीसी विभागाचे शहराध्यक्ष प्रदीपजी परदेशी, प्रदेश काँग्रेस सदस्य महबूब भाई नदाफ, संतोषजी सुपेकर, नारायणजी लोणकर, शकील शेख, संतोष हंगर्गी, सचिन सुर्वे, ईश्वर गायकवाड, अभिषेक यादव, रमेश सोनकांबळे तसेच धनगर समाजाचे युवा नेते उमेश धनगर व संदीप कुरवर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी सुजित यादव, प्रदीप परदेशी आणि इतर उपस्थित पदाधिकाऱ्यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

### सावरकर अवमान प्रकरणी राहुल गांधींची याचिका फेटाळली

पुणे (आरंभ पर्व) : वीर सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांच्या मातृवंशाची माहिती मागणारी याचिका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुण्यातील न्यायालयात दाखल केली होती. मात्र न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. मार्च २०२३ मध्ये लंडन येथे एका भाषणादरम्यान राहुल गांधी यांनी हिंदुत्ववादी विचारांवर आक्षेपार्ह टिप्पणी केल्याचा आरोप करत वीर सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात मानहानीचा दावा दाखल केला होता. सात्यकी सावरकर यांची आई हिमानी अशोक सावरकर या नथुराम गोडसे यांचा धाकटा भाऊ गोपाळ गोडसे यांच्या कन्या आहेत, अशी माहिती द इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तात देण्यात आलेली आहे. राहुल गांधी यांची याचिका फेटाळून लावताना खासदार/आमदार न्यायालयाचे विशेष न्यायाधीश अमोल शिंदे यांनी २८ मे रोजी असे निरीक्षण नोंदविले की, हा खटला राहुल गांधी यांनी लंडनमध्ये सावरकरांविरुद्ध केलेल्या कथित अवमानकारक विधानापुरता संबंधित आहे. सदर आदेश शनिवारी (३१ मे) न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला आहे. राहुल गांधी यांनी लंडनमध्ये एका कार्यक्रमात अनिवासी भारतीयांसमोर स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्य केले होते, असा आरोप करण्यात येत आहे. सात्यकी सावरकर यांच्या म्हणण्यानुसार, राहुल गांधी यांनी लंडन येथे बोलताना सावरकरांच्या पुस्तकाचा उल्लेख केला. ज्यात सावरकरांनी नमूद केले आहे की, ते आणि त्यांच्या पाच ते सहा मित्रांनी एका मुस्लीम व्यक्तीला मारहाण केली होती आणि यातून त्यांना आनंद मिळाला. सात्यकी सावरकर म्हणाले की, वीर सावरकर यांनी असे कोणतेही पुस्तक लिहिलेले नाही. तसेच असा कोणताही प्रसंग घडलेला नाही. आपल्या याचिकेत सात्यकी सावरकर म्हणाले की, राहुल गांधी जाणूनबुजून चुकीची आणि खोटी माहिती पसरविण्याचा प्रयत्न करत आहेत.

# मातृभाषेतून शिक्षणामुळे वाढतो आत्मविश्वास अन् यशाची खात्री

- **डॉ. अनिल सहस्रबुद्धे : एनईपी मुळे प्रादेशिक भाषेतील उच्च शिक्षणास अधिक महत्त्व - हर्षवर्धन पाटील**
- **पीसीसीओईच्या मराठी भाषेतील संगणक अभियांत्रिकीच्या पहिल्या तुकडीचा 'अश्वमेध २०२५' पदवी प्रदान समारंभ उत्साहात**



**यावेळी विद्यार्थी देवाशिष गायकवाड, जयती वाजिरे, पालक राजेंद्र पाठक, उद्योजक प्रतिनिधी एटीएक्सचे सीईओ अशोक गवळी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. अश्विनी वझे, डॉ. सुजाता कोल्हे यांनी, प्रास्ताविक डॉ. रचना पाटील यांनी केले. आभार प्रा. संजिवन भोईटे यांनी मानले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**
अभियांत्रिकीचे तांत्रिक शिक्षण मातृभाषेतून देण्याचा क्रांतिकारी निर्णय एआयसीटीने २०२० मध्ये घेतला. सध्या देशातील दहा राज्यांमध्ये हा उपक्रम सुरू आहे. मराठी भाषेतून अभियांत्रिकी शिक्षण देणारे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पीसीसीओई हे देशातील एकमेव महाविद्यालय आहे. या पदवी अभ्यासक्रमादरम्यान एकही विद्यार्थी शिक्षण अर्धवट सोडून बाहेर गेला नाही, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. पदवी प्राप्त ७५ टक्के विद्यार्थ्यांना रोजगार संधी प्राप्त झाल्या आहेत. हे कौतुकास्पद असून 'एआयसीटी'ने २०२० मध्ये प्रादेशिक भाषेतून उच्च शिक्षण देण्याचा घेतलेला निर्णय शिक्षण क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरला आहे. हे अधोरेखित होत आहे, असे मत एआयसीटीचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या (पीसीसीओई) प्रादेशिक भाषेतून संगणक अभियांत्रिकीच्या पहिल्या तुकडीचा पदवी प्रदान समारंभ 'अश्वमेध २०२५' शनिवारी (३१ मे) आयोजित करण्यात आला होता. यावेळी पीसीईटीचे विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, एटीएक्सचे सीईओ अशोक गवळी, पीसीसीओईचे संचालक व पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, संगणक अभियांत्रिकीच्या विभाग प्रमुख डॉ. रचना पाटील, राहुल कुलकर्णी विविध विद्याशाखेचे प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. तांत्रिक ज्ञान प्रादेशिक भाषेमध्ये रूपांतरित करण्यास कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रज्ञा यांचा उपयोग महत्त्वाचा आहे. त्यामुळे नवीन माहिती संकलित करणे, कौशल्य विकसित करणे यासाठी उपयुक्त आहे. येत्या पाच वर्षांत संगणक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होतील. भारतातील युवकसंख्या एक-पंचमांश आहे. आपला देश आज चौथ्या क्रमांकावर आहे. जपान, चीन, फ्रान्स या देशांनी आपापल्या मातृभाषेतून शिक्षण घेतले आणि स्वतःची उत्पादने निर्माण केली. आपणही मराठीतून शिक्षण घेऊन तशी उत्पादने तयार करू शकतो, असे डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले.

पीसीयू चे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, एनइपीने (नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण) धोरण तयार करताना प्रादेशिक भाषा वापरण्यास स्वायत्तता दिली आहे. प्रादेशिक भाषेतून शिक्षण, महत्त्व आणि उपयोग यापुढील काळात ठळकपणे दिसून येईल. पीसीसीओईचे संचालक, संगणक विभागप्रमुख, प्राध्यापकांनी मराठी भाषेतून अभियांत्रिकी शिक्षण देण्यासाठी भरपूर कष्ट घेतले. विद्यार्थी, पालकांशी संवाद साधत अडचणी दूर केल्या. आज ६७ विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी पदवी प्राप्त केली याचा अभिमान आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा, साहित्य यामध्ये प्रगती केली पाहिजे. आपले आई-वडील व जेथे शिक्षण घेतले त्या संस्थेला विसरू नका असे हर्षवर्धन पाटील म्हणाले.

संगणकीय प्रणाली मराठी भाषेतून तयार झाली पाहिजे. तरच मराठी भाषा खऱ्या अर्थाने ज्ञान भाषा होईल, असे डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले.





# मिंत्राच्या बहुप्रतीक्षित ईओआरएसच्या २२व्या आवृत्तीचा शुभारंभ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
फॅशन , ब्यूटी आणि लाइफस्टाइलचे भारतातील आघाडीचे डेस्टिनेशन असलेले मिंत्रा आपल्या महत्त्वाच्या एंड ऑफ रीझन सेल ईओआरएस च्या २२ व्या आवृत्तीचे आयोजन करत आहे. १२ जूनपर्यंत चालणारा हा बहुप्रतीक्षित शॉपिंग इव्हेंट देशभरातील फॅशन आणि ब्यूटीच्या रसिकांना दिपवून टाकेल. टियर १,टियर २ आणि उभरत्या शहरांमधील खरेदीदार १०, ०००पेक्षा जास्त ब्रँड्सच्या ४ मिलियनपेक्षा जास्त स्टाइल्सच्या सिलेक्शनचा शोध घेऊ शकतील, ज्यात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि देशात जन्माला आलेल्या ब्रँड्सचा समावेश आहे. प्रत्येक अभिरुचीसाठी आणि ट्रेंडसाठी येथे काही ना काही तरी मिळेलच. या सीझनमधल्या सर्वात स्टायलिश उत्पादनांनी आपला वॉर्डरोब आणि सौंदर्य प्रसाधनांचा खण रिफ्रेश करू पाहणाऱ्या ग्राहकांसाठी हे अगदी योग्य असे डेस्टिनेशन आहे. ईओआरएस दरम्यान ज्या श्रेणींना प्रेक्षकांचा विशेष प्रतिसाद लाभणे अपेक्षित आहे, त्या श्रेणी म्हणजे मेन्स कॅज्यूअल वेअर, मेन्स आणि वीमेन्स एथनिक वेअर, वीमेन्स वेस्टर्न वेअर, ब्यूटी आणि पर्सनल केअर, घड्याळे आणि इतर वेअरेबल्स, ॲक्सेसरीज, प्रवासी साधने आणि वस्तू, स्पोर्ट्स फुटवेअर, किड्स वेअर आणि वेडिंग कलेक्शन. ज्या ब्रँड्सना उदंड प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आहे, ते ब्रँड आहेत- लिव्हाइस, नाइकी, आदिदास, एच अँड एम, मँगो, लॉरियल, लॅक्मे, लिबास, डीकॅथलॉन, न्यू बॅलेन्स, रॉन्ग, यूएस पोलो असो. पूमा आणि रेअर रॅबिट. हलक्या-फुलक्या, हवेशीर उत्पादनापासून ते चमकदार स्टेटमेंट करणाऱ्या उत्पादनापर्यंत ही कलेक्शन्स प्रत्येक प्रसंगासाठी, मूडसाठी आणि पर्सनल स्टाइलला साजेसे असे काहीतरी हमखास ऑफर करतात.

अनेक नवीन लॉन्चिसमुळे ईओआरएस च्या २२ व्या आवृत्तीत खरेदी करणे एक आनंददायक अनुभव असणार आहे. या नवीन लॉन्चिसमध्ये गॅप हा यूएस चा प्रसिद्ध ब्रँड, प्रसिद्ध डिझाईनर तरुण ताहिलियानीची लक्झरी प्रेट लाइन – ओटीटी हे दोन्ही मिंत्रावर पहिल्यांदाच येत आहेत. ब्यूटी श्रेणीतील इतर आकर्षक नवीन कलेक्शन लॉन्चिस आहेत- एम्पोरियो अरमानी, एली साब, के - १८ आणि नवीन आलिया भट्ट लॉरियल कास्टिंग क्रीम ग्लॉस लाइन.

# अकरावीसाठी इनहाउस कोट्याअंतर्गत पूर्वीप्रमाणेच प्रवेश

- **यंदाच्या अकरावी प्रवेशांकरिता संस्थांतर्गत अर्थात इन हाउस कोट्यातील प्रवेशांबाबत बदल करण्यात आला होता.**
- **मात्र, या निर्णयाला विरोध झाला होता. त्यात पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, आदींसह सामाजिक संघटनांनी शिक्षण विभागाकडे पत्रव्यवहार करून नियमबदल मागे घेण्याची मागणी केली होती. त्या पार्श्वभूमीवर इन-हाउस कोट्यासाठीचा नियमबदल मागे घेण्यात आला आहे.**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
अकरावीसाठी इन हाउस (संस्थांतर्गत) कोट्यातील जागांबाबत करण्यात आलेला नियमबदल मागे घेण्यात आला आहे. पूर्वीच्याच पद्धतीने प्रवेश देण्याचे निर्देश शिक्षण विभागाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांना दिले आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थी, पालक, संस्थाचालकांना दिलासा मिळणार आहे. अकरावी ऑनलाइन प्रवेश नियंत्रण समितीचे अध्यक्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. त्यानुसार, 'एकाच संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गाच्या शाळा वेगवेगळ्या ठिकाणी असतील, तर अशा संस्थांमधील इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशांसाठी इन-हाउस कोटा १० टक्के असेल,' असे यात नमूद केले असून, त्यासाठी कार्यक्षेत्रही निश्चित करण्यात आले आहे.

'मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे या महसुली जिल्ह्यासाठी एक युनिट ग्राह्य धरण्यात आले असून, या तिन्ही जिल्ह्यांतील एकाच संस्थेच्या शाळांमधून इयत्ता दहावी उत्तीर्ण होणाऱ्या मुलांसाठी अकरावी प्रवेशाकरिता या तिन्ही महसुली जिल्ह्यांचे एक युनिट असेल,' असे पत्रकात नमूद करण्यात आले आहे. म्हणजे, एखादा विद्यार्थी ठाण्यातील एखाद्या शाळेतून दहावी उत्तीर्ण असेल, तर तो त्याच्याच शाळेच्या पालक संस्थेच्या, ठाण्यासह मुंबई शहर, मुंबई उपनगर येथे असलेल्या कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी प्रवेशासाठी इन-हाउस कोट्याला पात्र असेल. प्रसिद्धीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, 'मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे हा भाग सोडून राज्यातील इतर भागांसाठी एकाच संस्थेच्या शाळा व उच्च माध्यमिक विद्यालयासाठी १० टक्के इन-हाउस कोट्यासाठी महसुली जिल्हा हे युनिट असेल.

एकाच संस्थेच्या जिल्हांतर्गत असणाऱ्या सर्व शाळांकरिता व उच्च माध्यमिक शाखांकरिता इन-हाउस कोटा लागू असेल.' म्हणजे, पुणे जिल्ह्यातील एखाद्या शाळेतून दहावी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी, त्याच्या शाळेच्या पालक संस्थेच्या पुणे जिल्ह्यातील कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात इन-हाउस कोट्यांतर्गत अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र असेल.

- **केंद्र सरकारच्या विविध निर्यातपूरक व उद्योगाभिमुख योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन**

# जागतिक स्तरावर भारतीय निर्यातदारांना वाढत्या संधी

## डॉ. अजय सहाय यांचे प्रतिपादन; 'फिओ' व 'मिटकॉन' यांच्यातर्फे 'एक्स्पोर्ट कॉन्क्लेव्ह'




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
"देशाच्या अर्थव्यवस्थेचा आलेख जागतिक पातळीवर सातत्याने उंचावत आहे. तसेच राष्ट्रीय स्तराप्रमाणे जिल्हास्तरावरील वैशिष्ट्यपूर्ण घटकांच्या निर्यातीसाठी विविध योजना आहेत. भारतीय व्यावसायिकांना निर्यातीच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढत आहेत", असे प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाअंतर्गत फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशनचे (एफआयईओ-फिओ) महासंचालक डॉ. अजय सहाय यांनी केले. या पार्श्वभूमीवर उद्योगाभिमुख व विविध निर्यातपूरक योजनांच्या मदतीने निर्यातवाढीच्या संधींचा निर्यातदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयांतर्गत फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशन (एफआयईओ), मिटकॉन पुणे व कॅनरा बँक यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक्स्पोर्ट कॉन्क्लेव्ह'चे (निर्यात परिषद) आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत 'एफआयईओ'चे महासंचालक डॉ. अजय सहाय यांनी वाढते निर्यात अर्थकारण, ई-कॉमर्स क्षेत्रातील निर्यात, निर्यात क्षेत्रातील जोखीम तसेच निर्यातीच्या संधी, योजना अशा मुद्यांवर विवेचन केले. याप्रसंगी फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशन्स आणि मिटकॉन यांच्यातील सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या व कराराचे आदानप्रदान करण्यात आले. तसेच डॉ. अजय सहाय यांच्या हस्ते मिटकॉनच्या पिंपरी-चिंचवड केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यामुळे परिसरातील सात ते आठ लाख विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. मिटकॉनचे चेअरमन अजय अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक आनंद चलवादे, चंद्रशेखर भोसले, डॉ. गणेश खामगळ, संकेत लोंढे आदी उपस्थित होते.

नगर रस्त्यावरील हॉटेल नोवोटेल येथे झालेल्या कार्यक्रमात 'डीजीएफटी'चे अमित शर्मा, रिझर्व्ह बँकेच्या विदेशी चलन विनिमय विभागाच्या महासंचालक लता राधाकृष्णन, ईसीजीसीच्या महासंचालक अर्पिता सेन, इंडिया पोस्ट पुणे विभागाचे संचालक अभिजीत बनसोडे, कॅनरा बँकेच्या ट्रेझरी विभागाचे उपसंचालक केजेएस नाईक, मिटकॉनचे व्यवस्थापकीय संचालक आनंद चाळवदे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. विदेशी व्यापार महासंचालनालय, भारतीय पोस्ट, कॅनरा बँक, मिटकॉन व एक्स्पोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सुमारे २०० हून अधिक निर्यातदार, उद्योजक आणि स्टार्टअप प्रतिनिधी परिषदेत सहभागी झाले होते.

डॉ. सहाय यांनी केंद्र सरकारच्या निर्यात धोरणातील तरतुदी व बदल यांची माहिती उपस्थितांना दिली. 'निर्यातीच्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारा घटक होण्याची संधी उद्योजकांसह स्टार्टअपवाल्यांनीही घेतली पाहिजे. त्यांच्यासाठी एफआयईओची प्रादेशिक कार्यालये त्यांना साह्यकारी ठरतील. डिजिटल माध्यमाद्वाराही निर्यातीच्या अनेक संधी आहेत. भारतीय टपाल विभागाच्या अनेक योजना आहेत. ई-कामर्स निर्यात क्षेत्र विस्तारत आहे. हे सर्व घटक अभ्यासून उद्योजकांनी देशांतर्गत व्यापारवृद्धीसह आंतरराष्ट्रीय पातळीवरही निर्यातीतून ठसा उमटवावा. २०३० पर्यंत दोन ट्रिलियन डॉलर्सच्या निर्यातीचे उद्दिष्ट आपण ठेवले आहे, ते साध्य करण्यासाठी उद्योजकांनी योगदान द्यावे', असेही डॉ. सहाय म्हणाले.

आनंद चलवादे यांनी सामंजस्य करार झाल्याचा आनंद व्यक्त केला. पिंपरी-चिंचवड परिसरात मोठे औद्योगिक क्षेत्र विकसित झाले असून, राज्याच्या निर्यातीमध्ये मोठी भर घालण्याची क्षमता त्यामध्ये आहे. पुण्यासह सातारा, सांगली, सोलापूर, अहिल्यानगर, मराठवाडा, खान्देशसह इतर भागात निर्यातीला पूरक क्षेत्र विकसित होत आहे. त्यामुळे निर्यात प्रशिक्षण अभ्यासक्रम, निर्यातदारांची समुपदेशन, मेन्टॉरिंग, याची सुविधा उपल्बध होईल. निर्यात क्षेत्रासंबंधी सर्व माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे. त्यातून दरवर्षी सुमारे १००० निर्यातदार तयार करण्याचे ध्येय आहे. त्यातून देशाची व राज्याची अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल. नवीन रोजगार उपलब्ध होतील, असे चलवादे यांनी नमूद केले. या उपक्रमात 'फिओ' सर्वतोपरी मदत करेल, असे आश्वासन विभागीय संचालक श्री. तिवारी यांनी दिले.

अमित शर्मा यांनी 'डिजिटल माध्यमातून निर्यातवाढ' या विषयावर मार्गदर्शन केले. 'जिल्हा निर्यात केंद्रे विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे', असे ते म्हणाले. निर्यात कल, रिझर्व्ह बँकेची त्याविषयीची धोरणे, व्यापारवृद्धीतील चलन विनिमयासंबंधीच्या नियमावली, यांची माहिती लता राधाकृष्णन यांनी दिली. निर्यातवाढीसाठी एक्स्पोर्ट क्रेडिट इन्शुअरन्सचे महत्त्व, या विषयावर अर्पिता सेन यांनी सादरीकरण केले.

अभिजीत बनसोडे यांनी टपाल विभागामार्फत निर्यातीच्या योजनांची सविस्तर माहिती दिली. डाकघर निर्यात केंद्रांच्या माध्यमातून जिल्हा पातळीवरही निर्यातीची सुविधा उपलब्ध असल्याचे ते म्हणाले. थेट पार्सल सेवाही सुरू असून, त्याचा लाभ निर्यातदारांनी घ्यावा, तसेच इंटरनॅशनल मेल प्रॉडक्ट ऑफरिंग सुविधाही असल्याची माहिती त्यांनी दिली. या कार्यक्रमाचे व्यवस्थापन सीएसनाईन एंटरटेनमेंट्सचे चेतन गिरी यांनी केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.